# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक : 21.03.2024** **वार-गुरुवार**

---

1.देशातल्या युवकांचा उत्साह आणि नवोन्मेष यांच्यामुळे स्टार्टअप्सची घोडदौड वाऱ्याच्या वेगानं होत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

2.लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी; विदर्भातल्या 5 मतदारसंघांचा समावेश

3.माझं प्रेम चिमण्यांवर' या संकल्पनेसह चिमणी दिन काल सर्वत्र साजरा आणि,

4.अखिल भारतीय बाल ई साहित्य स्पर्धेत संतोष केंद्रे यांच्या लघुपटाला प्रथम राष्ट्रीय पुरस्कार

**महाकुंभ**

देशातल्या युवकांचा उत्साह आणि नवोन्मेष यांच्यामुळे स्टार्टअप्सची घोडदौड वाऱ्याच्या वेगानं होत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं स्टार्टअप महाकुंभमध्ये गुंतवणूकदारांशी संवाद साधताना ते बोलत होते. विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करताना स्टार्टअपचा वाटा मोलाचा असणार आहे, असं मोदी म्हणाले.

सव्वा लाख स्टार्टअप आणि 110 युनिकॉर्न यांच्यासह देश स्टार्टअपच्या संख्येत जगात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. कृषी, वस्त्रोद्योग, औषध, वाहतूक, अंतराळ, योग आणि आयुर्वेदात स्टार्टअप सुरू झाल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. उद्योगांनी पेटंट नोंदणीच्या बाबतीत सावध आणि आग्रही रहावं असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**अधिसूचना**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या पहिल्या टप्प्यात 19 एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानाबाबतची अधिसूचना काल जारी करण्यात आली. पहिल्या टप्प्यात 17 राज्यं आणि 4 केंद्रशासित प्रदेशांमधल्या 102 मतदार संघांमध्ये मतदान होणार आहे. राज्यातल्या रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर या 5 मतदारसंघांचा पहिल्या टप्प्यात समावेश आहे. राज्यात 48 लोकसभा मतदारसंघ असून एकंदर 5 टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे.

पहिल्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकींसाठी अर्ज दाखल करण्यास काल सुरवात झाली. 27 मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून 28 तारखेला अर्जांची छाननी होईल.

**मतदार नोंदणी**

मतदार नोंदणीचा कार्यक्रम अद्यापही सुरु आहे. अद्याप मतदार नोंदणी झालेली नाही, अशा पात्र नागरिकांकडून उमेदवारांचे अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या 10 दिवस आधीपर्यंत मिळालेले अर्ज मतदार यादीमध्ये नोंद घेण्यासाठी विचारात घेण्यात येतील, असं आयोगानं कळवलं आहे.

**टपालाद्वारे मतदान**

प्रसार माध्यमांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील टपालाद्वारे मतदान करण्यास निवडणूक आयोगानं काल परवानगी दिली. आयोगानं यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे.

**एक खिडकी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी राजकीय पक्ष, उमेदवार आणि प्रतिनिधींना प्रचार विषयक विविध परवानगी मिळवणं सोयीचं व्हावं यासाठी एक खिडकी योजना कक्ष सुरु करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रचार विषयक विविध परवानगी देण्यासाठी हे कक्ष कार्यरत राहणार आहेत.

**मतदार जागृती अभियान**

मतदानाविषयी जनजागृती करणारे अनेक कार्यक्रम सर्वत्र होत असून, विद्यार्थ्यांशी संवाद, शेतकऱ्यांची बांधांवर भेट, फेऱ्या, परिसंवाद असे अनेक कार्यक्रम घेण्यात येत आहे. जिल्ह्यांच्या मुख्यालयात आढावा बैठकींचं आयोजन करण्यात येत असून निवडणूक सज्जतेचा आढावा घेण्यात येत आहे.

**चवदारतळे**

रायगड जिल्ह्यातल्या महाड इथल्या चवदार तळे सत्याग्रहाचा 97 वा वर्धापन दिन काल साजरा करण्यात आला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना सकाळी रायगड पोलिसांच्या वतीनं मानवंदना देण्यात आली. 20 मार्च 1927 रोजी सत्याग्रह करून महाडच्या चवदार तळ्याचं पाणी सर्व मानवजातीसाठी खुलं करणाऱ्या महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून त्यांना मानवंदना दिली आहे.

**नीट**

वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठी होणारी राष्ट्रीय प्रवेश परीक्षा ‘नीट’ ही 23 जून रोजी होणार असल्याचं राष्ट्रीय वैद्यकीय आयोगानं कळवलं आहे. या आधी ही परीक्षा 7 जुलै रोजी होणार होती. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय लोकसेवा आयोगाची ‘नागरी सेवा पूर्व परीक्षा – 2024’ पुढे ढकलण्यात आली आहे. 26 मे रोजी होणारी ही परीक्षा आता 16 जून रोजी होणार आहे.

**चिमणीदिन**

प्रत्येक बालकाच्या भावविश्वाचा अविभाज्य घटक असणारा पक्षी म्हणजे चिमणी. वर्षानुवर्षे मानवी वस्त्यांमध्ये बागडणाऱ्या चिमण्या नागरीकरण, हवामानातले बदल आणि अधिवास धोक्यात आल्यामुळे दिसेनाश्या होऊ लागल्या आणि पक्षीप्रेमींबरोबरच सामान्य नागरिकही चिमणी संवर्धनासाठी एकत्र आले. यातूनच साजरा होऊ लागला जागतिक चिमणी दिन. “माझं प्रेम चिमण्यांवर’ या संकल्पनेसह काल चिमणी दिन सर्वत्र साजरा करण्यात आला. वाशीम जिल्ह्यातल्या कामरगांव इथल्या जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळी आणि जनजागृती फेरीच्या माध्यमातून ‘चिमणी वाचवा’ हा संदेश दिला. पक्ष्यांसाठी परिसरातल्या वृक्षांवर पाण्याची सोय केली.

बुलडाणा जिल्ह्यातला चिऊताई घरकुल हा उपक्रम सर्वत्र मूळ धरू लागला आहे. सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूर इथल्या गुलजार आत्तार यांनी पक्षी संवर्धनासाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. त्या म्हणाल्या.....

बाईट – 31 सेकंद  माणसांच्या घरांबरोबरच चिमण्यांनाही घरटी हवीत, ही जाणीव जर मनात रुजली, तर वेगळा चिमणी दिन साजरा करण्याची गरजच पडणार नाही. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांसह मेघना देशपांडे पुणे.

**पुरस्कार**

अखिल भारतीय बाल ई साहित्य स्पर्धेत नांदेड जिल्ह्यातल्या धारेगाव इथल्या जिल्हा परिषद शाळेतले शिक्षक संतोष केंद्रे यांना 'ऑक्सिजन' या लघुपटासाठी प्रथम क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

तर जिल्हा परिषद शाळा नूतन भोकरचे शिक्षक मिलिंद जाधव यांच्या ध्वनीफितीला परीक्षकांचा विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. मेघालय राज्यात शिलॉंग इथं नुकत्याच झालेल्या एका विशेष समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. 'ऑक्सिजन' हा लघुपट वाढत्या प्रदूषण आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या ऑक्सिजनच्या कमतरतेवर भाष्य करतो. यात भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य अडचणींचं चित्रण करण्यात आलं आहे.

**प्रशिक्षण**

सातारा जिल्ह्यात डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियानाच्या अंतर्गत निवड करण्यात आलेल्या गटप्रमुख, कृषी अधिकारी आणि कर्मचारी यांचा दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच बोरगाव इथं पार पडला. कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव आणि कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा सातारा यांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. नैसर्गिक शेती संबंधित विविध बाबींवर यावेळी मार्गदर्शन करण्यात आलं.

**अतिदक्षता विभाग**

पालघर जिल्ह्यातल्या डहाणू मध्ये उपजिल्हा रुग्णालयात नवजात शिशुंसाठी अद्ययावत अतिदक्षता विभाग सुरु करण्यात आला आहे. अत्याधुनिक यंत्रांसह विविध सुविधा इथे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**मर्ढेकर-पत्रक**

मराठी भाषेमधील युगप्रवर्तक कवी बाळ सीताराम मर्ढेकर यांच्या कवितांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम –अजून येतो वास फुलांना- काल पुण्यात सादर करण्यात आला. मर्ढेकरांची कविता अजूनही कालसुसंगत आहे. त्यांनी 40 आणि 50 च्या दशकामध्ये लिहिलेल्या कवितांचे अनेक संदर्भ आजच्या काळातही सापडतात हे वास्तव याप्रसंगी श्रीनिवास वारुंजीकर, कवी-पत्रकार मधुसूदन पतकी आणि जुई खोत यांनी अभिवाचनातून उलगडून दाखवलं. अनेक राष्ट्रांमधील युद्धस्थिती, कोरोनामुळे आलेली क्षणभंगुरता, नागरिकांना करावं लागलेलं सक्तीचं स्थलांतर असे अनेक संदर्भ देणाऱ्या भंगू दे काठिण्य माझे, पिपात मेले ओल्या उंदीर, अजून येतो वास फुलांना, मी एक मुंगी, दवांत आलीस भल्या पहाटे, फलाटदादा, बन बांबूंचे पिवळ्या गाते, ह्या गंगेमध्ये गगन वितळले या मर्ढेकरांच्या कविता यावेळी सादर करण्यात आल्या.

**वरिष्ठहॉकी**

पुण्यात सुरु असलेल्या चौदाव्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत काल पहिल्या उपांत्यपूर्व लढतीत गत विजेता मध्य प्रदेश संघानं पश्चिम बंगाल संघावर 4-3 असा विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. पेनल्टी शूट आऊटमध्ये मध्य प्रदेश संघाला तीन तर पश्चिम बंगाल संघाला दोन गोल करता आले. महाराष्ट्रान मानिपुरवर २ -१ अशी मात करत उपांत्य फेरी गाठली.

**<u>वरिष्ठ कबड्डी</u>**

अहमदनगरमध्ये आजपासून 70 व्या वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय कबड्डी स्पर्धांना सुरवात होत आहे.  24 तारखेपर्यंत होणाऱ्या या स्पर्धांमध्ये 32 राज्यांचे संघ सहभागी होणार आहेत .

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र उन्हाचा कडाका वाढू लागला असून पारा अनेक ठिकाणी 38 अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहील. तर विदर्भात तुरळक ठिकाणी विजा आणि वाऱ्यासह वादळी पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.